**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**हिं. बा. ठा. वैद्यकिय महाविद्यालय आणि डॉ. रु. न. कूपर रुग्णालय, जुहू - ४०० ०५६.**

**आअ/५९१३/कूपर दि.०५.०७.२०१९**

---

## सुचनापत्र

बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभागातील हि. बा. ठा. वैद्यकिय महाविद्यालय आणि डॉ. रु. न. कूपर मनपा रुग्णालय, जुहू, विले-पार्ले(प) येथे मा. अतिरिक्त आयुक्त (प. उ.) यांच्या मंजुरी क्र. अति.आयुक्त/प.उ./८२८८/एच दि. ०१.०६.२०१९ नुसार ६ महिन्यांच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात बहूउदेशीय कामगार (एम.पी.एल) ३० पदे पुरविण्याकरिता के/पश्चिम येथील स्थानिक नोंदणीकृत एन.जी.ओ. ( मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियत १९५०( सन १९५० चा मंबई अधिनियम क्र. २९ )) अन्वये नोंदणी असलेल्या संस्थांकडून सदरची सेवा घेण्यास मोहोर बंद पाकीटात अर्ज (इच्छापत्र) मागविण्यात येत आहे.

अर्जाचा नमुना इच्छूक संस्थांना के/पश्चिम विभागातील हि. बा. ठा. वैद्यकिय महाविद्यालय आणि डॉ. रु. न. कूपर मनपा रुग्णालय, जुहू, पहिला मजला, डी विंग, विले-पार्ले(प) , येथून रु.२७८०/- अधिक ५ टक्के वस्तु व सेवा कर चे चलन प्राप्त करुन रोख रक्कम किंवा राष्टीयकृत बॅंकेचा डी. डी. '' बृहन्मुंबई महानगरपालिका'' या नावाने मनपाच्या नागरी सुविधा केंद्रामध्ये (सी.एफ.सी.) जमा करुन दि. ०५.०७.२०१९ ते १२.०७.२०१९ पर्यंत सकाळी ११.०० वा. ते १.०० वा. यावेळेत प्राप्त करावे (सार्वजनिक सुटटी व साप्ताहिक सुटटी वगळून). पात्र संस्थाच्या यादीतून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप वैद्यकिय अधिक्षक, अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशील, अर्ज व इच्छापत्र इ.साठी सदर रुग्णालयाच्या प्रशासकिय कार्यालयात सकाळी ११.०० वा. ते ४.०० वा. संपर्क करावा.

संस्थेने सदर रुग्णालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख १२.०७.२०१९ दुपारी१.०० वाजेपर्यंत आहे.

सदर बाबतीत प्राप्त कागदपत्रे दि. १५.०७.२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. उघडण्यात येतील.

सही/-

वैद्यकिय अधिक्षक

हिं. बा. ठा. वैद्यकिय महाविद्यालय आणि

डॉ. रु. न. कूपर रुग्णालय